# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर

(गृह शाखा)

दुरध्वनी क्र. ०२१७- २७३१०२१,    email-id-dcbsolapur@gmail.com

---

क्र. २०१९/डिसीबी/२/आरआर/८६९    दिनांक- २९/०१/२०१९

**(फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये घोषणापत्र)**

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडिल पत्र जा.क्र.- ए. टी. सी./२०१९-३१, दिनांक- २५/०१/२०१९ अन्वये निर्दशनास आणून दिले आहे की, देशात, राज्यात व महत्त्वाच्या शहरात दहशतवादी कारवायात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी हे स्थानिक लोकांत मिसळुन तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्य करुन घातपाती कारवायांना अंतिमरुप देतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मानवी व मालमत्तेचे नुकसान होत असुन त्याचबरोबर अशा घटनांमुळे जनमाणसांमध्ये घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माणा होणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत. सदर दहशतवादी कारवायामध्ये दहशतवादी हे जुनी चारचाकी व दुचाकी वाहने तसेच इतर वस्तु ह्या वापरतात. तसेच ते सदर कारवाच्या वेळी ते भाडयाने रुम/ प्लॉट/ लॉज/ घेवुन राहतात. तसेच मस्जिद, चर्च, धर्मशाळा, येथे आश्रय घेतात किंवा सदरची जागा विकत किंवा लिजने घेतात. त्यासाठी ते स्थानिक ओळख म्हणुन प्रॉपर्टी डिलर/ ब्रोकर /एजंन्ट जुने वाहन विक्री-खरेदी करणारे दुकानदार यांची मदत घेतात.

जिल्ह्यात नवीन राहण्यासाठी येणारे व्यक्ती, यांची माहिती असणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील आपल्या स्थळ सिमा हद्दीत जी-जी व्यक्ती नव्याने राहण्यासाठी येईल त्या व्यक्तीस व जे कोणी अशा व्यक्तीस राहण्यास जागा उपलब्ध करुन देईल असे घरमालक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंन्ट, मस्जिद, चर्च, धर्मशाळा इत्यादीचे विश्वस्त यांना अशा अनोळखी नविन राहावयास आलेल्या व्यक्तींची त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपुर्ण माहिती न चुकता तो राहावयास आल्यानंतर किंवा विचारपुस केल्यावर लगेच संबंधीत पोलीस स्टेशनला देणे गरजेचे आहे. जेणेकरुन भविष्यात होणाऱ्या दखाद्या दहशतवादी कारवाईस, गुन्ह्यास प्रतिबंध होवु शकतो व सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आबाधित राहण्यास साह्य होईल तसेच लोकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होवुन सार्वजनिक शांतता वाढीस लागण्यास बळ मिळेल.

आणि ज्याअर्थी असा आदेश काढण्यापूर्वी जिल्हयातील सर्व घर / जागा धार्मिक स्थळांचे विश्वस्त वा काळजीवाहक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंट, जुने वाहन खरेदी विक्री करणारे व्यक्ती व संस्था तसेच भाडयाने वाहन देणारे व्यक्ती व संस्था / वाहन मालकांना नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश देतो की, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व घरमालक, प्रॉपर्टी डिलर / ब्रोकर / एजंट, जुने वाहन विक्री-खरेदी करणारे व्यक्ती व संस्था, भाडयाने वाहन देणारे व्यक्ती व संस्था तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना खालील कृत्यांना बंदी घालत आहे.

१. कोणत्याही अनोळखी नवीन राहावयास येणा-या व्यक्तींची व त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपुर्ण माहिती तसेच सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात जी-जी व्यक्ती नव्याने राहण्यासाठी येईल अथवा रहावयास आल्यावर अथवा रहावयास येण्याबाबत विचारपूस केल्यानंतर लगेच न चुकता संबंधित पोलीस स्टेशनला त्यांचे संबंधीची माहिती न देणे व अशा अनोळखी व्यक्तींना रहावयास जागा पोलीसांना माहिती न देता उपलब्ध करून देणे.

२. कोणत्याही अनोळखी नवीन जुने वाहन घेण्यास येणा-या व्यक्तींची व त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपूर्ण माहिती तसेच जुने वाहन घेण्यासाठी विचारपूस केल्यानंतर लगेच न चुकता संबंधित पोलीस ठाणेस त्यांचे संबंधीची माहिती न देणे व अशा अनोळखी व्यक्तींना पोलीसांना माहिती न देता जुने वाहन खरेदी - विक्री / भाडयाने उपलब्ध करून देणे.

सदरचा आदेश हा दिनाक- ३१/०१/२०१९ रोजी ते दिनांक- ३१/०३/२०१९ (दोन्ही दिवस धरुन) सोलापूर जिल्हयाचे ग्रामीण हद्दीत (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) व सर्व नगरपालिका हद्दीत लागू राहील.

हा आदेश माझ्या सही व शिक्क्या निशी दिला आहे.

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE अपर जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(संजय तेली)
अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर

स्थळ :- सोलापूर
दिनांक :- २९/०१/२०१९

प्रत:- पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडे प्रसिध्दीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर क्र. १ / सोलापूर क्र. २ / मंगळवेढा / पंढरपूर / माढा / माळशिरस विभाग अकलूज यांना माहितीसाठी.

प्रत:- व्यवस्थापक,येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. यांचेकडे राजपत्रात प्रसिध्द करणेसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना सर्व स्थानिक प्रमुख वृत्तपत्रात प्रसिध्द करणे कामी.

प्रत:- तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, उत्तर सोलापूर/ दक्षिण सोलापूर/ बार्शी/ अक्कलकोट/ माढा/ मोहोळ/करमाळा/ पंढरपूर/ सांगोला/ मंगळवेढा/ माळशिरस यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रत:-मुख्याधिकारी, नगरपालिका, बार्शी/ कुर्डूवाडी/सांगोला/ पंढरपूर/ मंगळवेढा/अक्कलकोट/मैंदर्गी/दुधनी/ करमाळा.

प्रत :- राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

२/- सदरचा आदेश दि. ३१.०१.२०१९ ते ३१.०३.२०१९ पर्यंत वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिद्ध करावे.

D:\E DRIVE\vv (Repaired).doc